चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०२ में, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर होणार ई—चालान द्वारे कार्यवाही

मोटार वाहन कायद्याचे नियम पाळणे हे प्रत्येकांचे कर्तव्य आहे. वाहन चालवितांना नियमांचे तंतोतंत पालन केले तर रस्त्यावर चालणारी प्रत्येक व्यक्ती सुरक्षित राहु शकते. अपघताचे प्रमाण कमी व्हावे तसेच बेशिस्त वाहन चालकांवर लगाम बसावा याकरीता चंद्रपुर जिल्हयात दि. ०३ मे २०१९ पासुन आता ई—चालाण द्वारे वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडुन दंड वसुल केला जाणार आहे.

ई—चालाण मशिनमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असुन ज्या वाहनांवर कार्यवाही करावयाची आहे त्या वाहनांची सर्व माहिती ई—चालाण मशिनमध्ये आता पोलीसांना पाहता येणार आहे. त्यामुळे वाहन चोरीचे आहे किंवा स्क्रॅपमधील आहे तसेच एखाद्या गुन्हयात वापरलेले आहे काय हे सुध्दा माहिती होणार आहे. शिवाय ज्या वाहनचालकांकडुन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन होईल अशा वाहन चालकाचा व वाहनाचा पुरावा म्हणुन फोटो घेतला जाणार आहे.

ई—चालान मशिन हाताळण्यासाठी अत्यंत सोपे व हलके आहे. यातुन केलेल्या कार्यवाहीची माहिती वरिष्ठांणा सहजरित्या पाहता येणार असुन ई—चालान मशिनमध्ये एकदा केलेले चालाण रद्य करता येणार नाही. सदर मशिनचे प्रात्याक्षिक आज दि. ०२ मे २०१९ रोजी सावरकर चौक येथे चंद्रपुर जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. श्री महेश्वर रेड्डी यांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

ई—चालाण मशिनमुळे वाहतुक विभागामध्ये पारदर्शकता येणार असुन बेशिस्त वाहनचालकांवर कडक कार्यवाही होणार असल्याचे पोलीस अधीक्षक चंद्रपुर, डॉ. श्री. महेश्वर रेड्डी यांनी सांगीतले. तसेच मोटार वाहन कायद्याच्या नियमांचे पालन करण्याचेही पोलीस अधीक्षक यांनी जनतेला आवाहन केले.

———————————————————————————————————